IIP: WJHSS
IIP
World Journal of Humanities and Social Sciences

An Online Peer-Reviewed / Refereed Journal
Vol: 01 No. Issue IV, (October-December) (2025)
Impact Factor: IIFS: 5.75
ISSN: 3107-6661 (Online)

# "सातारा जिल्ह्यातील दारिद्र्य निर्मूलनामध्ये अंत्योदय अन्न योजनेचे योगदान"

**सहा. प्रा. डॉ. मनिषा सुरेश पवार**

प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालय, देऊर

**Article Info**

***Article History:***
Received: 15th Dec 2025
Accepted: 18th Dec 2025
Published: 20th Dec 2025

***Keywords:***

*दारिद्र्य, अंत्योदय अन्न योजना,अन्नसुरक्षा, नियतन, लाभार्थी, सातारा जिल्हा.*

**ABSTRACT**

भारताला स्वतंत्र होऊन ७५ वर्षे झाली असूनही देशात दारिद्र्य ही अत्यंत गंभीर सामाजिक व आर्थिक समस्या आहे . दारिद्र्य निर्मूलनासाठी केंद्र सरकार व राज्य सरकार विविध कल्याणकारी योजना राबवत आहे. यातीलच एक महत्त्वाची योजना म्हणजे अंत्योदय अन्न योजना होय. अत्यंत गरिब कुटुंबांना अन्नसुरक्षा पुरवण्यामध्ये , दारिद्र्य निर्मूलनामध्ये आणि त्यांचे राहणीमान सुधारण्यामध्ये या योजनेचे योगदान खूप मोठे आहे. सातारा जिल्ह्यातील प्रत्यक्ष परिस्थिती पाहता सातारा जिल्हा हा कृषीप्रधान आहे तसेच या जिल्ह्याचा बराचसा भाग दुष्काळी आहे. अनेक कुटुंब अती अल्प उत्पन्नावर जगत असतात. ग्रामीण भागात अन्न आणि रोजगाराचा प्रश्न नेहमीच महत्त्वाचा राहिला आहे. अंत्योदय अन्न योजनेअंतर्गत पात्र लाभार्थींच्या कुटुंबांना सुलभ पद्धतीने सवलतीचे अन्नधान्य पुरविले जाते. अंत्योदय अन्न योजने अंतर्गत महाराष्ट्रात विविध जिल्ह्यांप्रमाणे सातारा जिल्ह्यातही हजारो कुटुंबांना या योजनेचा लाभ मिळत असल्याचे असल्याचे दिसून येते. प्रस्तुत शोध निबंधामध्ये सातारा जिल्ह्यातील अंत्योदय अन्न योजनेचा अभ्यास केला गेला आहे. सातारा जिल्ह्यातील अंत्योदय अन्न योजनेची अंमलबजावणी, या योजनेतील लाभार्थ्यांची संख्या, या योजनेअंतर्गत होणारे अन्नधान्याचे नियतन, योजनेचा दारिद्र्य निर्मूलनातील सहभाग व ही योजना राबवताना येणाऱ्या अडचणींचा अभ्यास केला गेला आहे.

***Plagiarism Check Report:***
Date of Report: Dec 17, 2025
Similarity Index: 2%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2025 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite:** Pawar, M. S. (2025). सातारा जिल्ह्यातील दारिद्र्य निर्मूलनामध्ये अंत्योदय अन्न योजनेचे योगदान. *IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS)*, 1(VI), 2496–2500.

## ➢ प्रस्तावना-

कृषिप्रधान भारताला अजूनही दारिद्रय ,उपासमार, अन्नसुरक्षा सारख्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर अंत्योदय अन्न योजना अत्यंत महत्वाची व गरीबाभिमुख योजना मानली जात आहे. दारिद्रय रेषेखालील सर्वात गरीब कुटुंबाना अन्नधान्याचा पुरवठा करण्यासाठी आणि त्यांना अन्नसुरक्षा देण्यासाठी भारत सरकारने २५ डिसेंबर २००० साली तत्कालीन पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली ‘ अंत्योदय अन्न योजना ’ सुरु केली.राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम (NFSA )२०१३ मध्ये या योजनेत काही बदल करण्यात आले. २०१३ च्या शासन निर्णयाद्वारे नमूद केलेले निकष पूर्ण करणाऱ्या दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचा अंत्योदय अन्न योजनेत समावेश होतो. या योजनेचे लाभार्थी ग्रामीण व शहरी भागातील भूमिहीन मजूर ,लहान व सीमांत शेतकरी ,कारागीर ,हमाल ,फेरीवाले, घरकाम करणारे कामगार ,बांधकाम मजूर ,विधवा ,अपंग ,रिक्षावाले ,आदिम आदिवासी ,फळ-फुल विक्रेते, कुष्ठरोगी आणि ६० वर्षावरील जेष्ठ नागरिक ज्यांना उत्पन्नाचा कोणताही आधार नाही हे असतात.महाराष्ट्र सरकारच्या अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागामार्फत हि योजना चालविली जाते .या योजनेतील लाभार्त्यांना भारत सरकारच्या अंत्योदय अन्न योजने अंतर्गत अंत्योदय रेशन कार्ड (AAY)दिले जाते.

अंत्योदय अन्न योजना ही भारत सरकार व राज्य सरकार यांच्या सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत राबवली जाते. या योजनेचा मुख्य उद्देश्य गरीबातील गरीब (Poorest of the Poor) कुटुंबांना दरमहा धान्य (तांदूळ व गहू) अत्यंत कमी दरात उपलब्ध करून देणे आहे. या योजनेंतर्गत पात्र लाभार्थींना दरमहा २० किलो गहू व १५ किलो तांदूळ असे एकूण ३५ किलो धान्य दिले जाते आणि तेही केंद्र शासनाने ठरवलेल्या अतिशय सवलतीच्या दरात म्हणजे तांदळाचे ३/- प्रति किलो व गहूचे २/- प्रति किलो दराने. त्यामुळे गरीब कुटुंबांना त्यांच्या मूलभूत अन्न गरजा पूर्ण करण्यास मदत होते. ही योजना राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, 2013 (NFSA) अंतर्गत राबवली जाते ज्यामुळे गरीब वर्गांना अन्नसुरक्षा साठी कायदेशीर अधिकार मिळतात. कुटुंबांचा आर्थिक भार कमी होतो आणि अन्न असुरक्षा सारख्या समस्यांवर सकारात्मक परिणाम होतो, ज्यायोगे दारिद्रय निर्मूलनामध्ये योगदान मिळते.

सातारा जिल्हा हा ग्रामीण जिल्हा म्हणून ओळखला जातो. या जिल्ह्याचा बराचसा भाग दुष्काळी आहे. जिल्ह्यातील अनेक कुटुंबे आर्थिकदृष्ट्या दुर्बल आहेत. सातारा जिल्ह्यात दारिद्रय निर्मूलनासाठी शासन स्वयंसेवी संस्था व स्थानिक स्वराज्य संस्था यांच्याकडून विविध कार्यक्रम व योजना राबिवल्या जात आहेत.त्यातीलच हि एक महत्वाची अंत्योदय अन्न योजना होय.

अन्नसुरक्षा आणि सामाजिक संरक्षण हा या योजनेचा एक उद्धेश आहे. सातारा जिल्ह्यात रेशन दुकानांचे व लाभार्त्यांचे POS म्हणजे बायोमेट्रिक प्रमाणीकरण झाले आहे,त्यामुळे प्रत्येक कुटुंबात किती व्यक्ती असून ,या योजनेतील लाभार्थी कुटुंब कोणती याची तंतोतंत माहिति मिळत आहे. १ जानेवारी २०२३ पासून अंत्योदय अन्न योजनेच्या लाभार्त्यांना मोफत धान्य वितरण करण्यास सुरुवात झाली आहे.त्यामुळे आता या लाभार्थी कुटुंबाचा अन्नधान्यावरील खर्च बराच कमी झाला आहे.परिणामी या योजनेची दारिद्रय कमी होण्यास मदत होत आहे.

➢ **संशोधन समस्या –**

शेतीप्रधान सातारा जिल्ह्यातील अंत्योदय अन्न योजनेतील लाभार्त्यांच्या संख्येत व नियतनात बदल झाला आहे का ? हे अभ्यासाने म्हत्वाचे ठरते. तसेच अंत्योदय अन्न योजनेमुळे अत्यंत गरीब कुटुंबांचे दारिद्रय कमी होण्यात योगदान कसे व किती आहे ? हि योजना अधिक प्रभावी कशी करता येईल हे समजून घेणे .

➢ **संशोधनाची उद्दिष्टे –**

१. सातारा जिल्ह्यातील अंत्योदय अन्न योजनेचा अभ्यास करणे.

२. दारिद्र्य निर्मूलनामध्ये अंत्योदय अन्न योजनेचा सहभाग अभ्यासणे.

३. या योजनेच्या अंमलबजावणीतील अडचणींचा अभ्यास करणे.

४. आवश्यक उपाययोजना सुचवणे

➢ **संशोधन पद्धती –**

या शोध निबंधामध्ये वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर केला आहे. दुय्यम सामग्री द्वारे माहिती संकलन केली आहे.यासाठी विविध पुस्तके, मासिके, नियतकालिके, संशोधन लेख, केंद्र व राज्य सरकारचे अहवाल, सातारा जिल्हा पुरवठा विभागाची आकडेवारी , सातारा जिल्हा आर्थिक सर्वेक्षण अहवाल यामधून २०१८- १९ ते २०२२- २३ या कालावधीतील माहिती आणि आकडेवारी गोळा केली आहे.

➢ **संशोधनाची मर्यादा** – सदर संशोधना मध्ये फक्त सातारा जिल्ह्यातील अंत्योदय अन्न योजनेचा अभ्यास केला गेला आहे .

➢ **तथ्य संकलन आणि विश्लेषण-**

**तक्ता क्रमांक १**

(धान्य मे. टन मध्ये)

| **अ.क्र.** | **वर्ष** | **पिवळी शिधापत्रिका धारकांची संख्या** | **अन्नधान्याचे नियतन** | |
|---|---|---|---|---|
| | | | **तांदूळ** | **गहू** |
| १ | २०१८ -१९ | ३०३१३ | ५७८८ | ७५७६ |
| २ | २०१९ -२० | ३०३०५ | ४९४० | ८३५६ |
| ३ | २०२० -२१ | १५०४६९ | ३५८८ | ८९३५ |
| ४ | २०२१ -२२ | १३३५६० | ३३३५ | ८५११ |
| ५ | २०२२ -२३ | २६५५८ | ६५२२ | ५४९२ |
| ६ | २०२३ -२४ | २६९६६ | ६६४५ | ४९५४.३ |
| **सरासरी** | | **६६३६२** | **५१३६** | **७३०४** |
| **प्रमाणित विचलन** | | **५८८६५.२७** | **१४३५.३७** | **१६७९.४१** |
| **भिन्नतेचे गुणांक** | | **८८.७०** | **२७.९५** | **२२.९९** |
| **चक्रवाढ वाढीचा वार्षिक दर** | | **-०.०२** | **०.०३** | **-०.०८** |
| **कमाल** | | **१५०४६९** | **६६४५** | **८९३५** |
| **किमान** | | **२६५५८** | **३३३५** | **४९५४.३** |

स्त्रोत - सातारा जिल्हा आर्थिक सर्वेक्षण अहवाल २०२३-२४

वरील तक्ता क्र.१ मध्ये सातारा जिल्ह्यातील २०१८ -१९ ते २०२३ -२४ या कालावधीतील अंत्योदय अन्न योजनेतील पिवळी शिधा पत्रिका धारकांची संख्या आणि तांदूळ आणि गहू अन्नधान्याचे नियतन दर्शवली आहे.२०१८ -१९ ते २०२३ -२४ या कालावधीतील अंत्योदय अन्न योजनेच्या पिवळी शिधा पत्रिका धारकांची संख्येची सरासरी ६६३६२ इतकी आहे .प्रमाणित विचलन ५८८६५.२७ इतके आहे. पिवळी शिधापत्रिका धारकांच्या संख्येचा भिन्नतेचा गुणांक ८८.७० टक्के इतका आहे .तर चक्रवाढ वाढीचा वार्षिक दर -०.०२ टक्के आहे .पिवळी शिधापत्रिका धारकांची कमाल संख्या १५०४६९ इतकी सन २०२०-२१ या वर्षी आहे. तर किमान संख्या २६५५८ इतकी सन २०२२-२३ यावर्षी आहे.

सन २०१८-१९ ते २०२३-२४ या कालावधीतील अंत्योदय अन्न योजनेतील तांदूळ व गहू या अन्नधान्याचे नियतानाची आकडेवारी पाहता तांदूळ नियतनाची सरासरी ५१३६ मे .टन तर गहू नियतनाची सरासरी ७३०४ मे .टन इतकी आहे. तांदूळ नियतनाचा भिन्नतेचा गुणांक २७.९५ टक्के आहे तर गहू नियतनाचा भिन्नतेचा गुणांक २२.९९ टक्के आहे . तसेच तांदूळ नियतनाचा चक्रवाढ वाढीचा वार्षिक दर ०.०३ टक्के आहे .आणि गहू नियतनाचा चक्रवाढ वाढीचा वार्षिक दर -०.०८ इतका आहे.तांदुळाचे कमाल नियतन ६६४५ मे.टन सन २०२३-२४ झाले आहे.तर गव्हाचे कमाल नियतन ८९३५ मे.टन सन २०२०-२१ साली झाले आहे. तांदुळाचे किमान नियतन ३३३५ मे.टन सन २०२०-२१ साली झाले आहे तर गव्हाचे किमान नियतन ४९५४.३ मे.टन सन २०२३-२४ साली झाले आहे.

सातारा जिल्ह्यातील २०१८-१९ ते २०२३-२४ या कालावधीतील अंत्योदय अन्न योजनेतील पिवळी शिधा पत्रिका धारकांची संख्या आणि तांदूळ आणि गहू अन्नधान्याचे नियतन आकडेवारीवरून असे दिसून येते कि सन २०२०-२१ आणि सन २०२१-२२ या कोरोना काळात अंत्योदय अन्न योजनेतील पिवळी शिधा पत्रिका धारकांची संख्या वेगाने वाढली मात्र त्या नंतर नीचांकी घट झाली आहे. तसेच वरील तक्त्या मध्ये तांदूळ नियतन वाढत असलेले दिसत आहे मात्र या वाढीचा दर अत्यंत कमी आहे.तसेच गहू नियतन घटात असल्याचे दिसत आहे. वरील तक्त्यातील आकडेवारीचा अभ्यास करता असे स्पष्ट होते कि सातारा जिल्ह्यातील अंत्योदय अन्न योजनेतील लाभार्त्यांची संख्या व अन्नधान्य नियतन घटत असल्यामुळे दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांची संख्या कमी होत आहे म्हणजेच सातारा जिल्ह्यातील लोकांचे राहणीमान सुधारत आहे.

- **निष्कर्ष-**

सातारा जिल्ह्यात अंत्योदय अन्न योजनेने गरीब आणि अत्यंत गरिब कुटुंबांना अन्न उपलब्ध करून दिले आहे, त्यामुळे त्यांचा खर्च कमी झाला आणि त्यांच्या जीवनमानात अपेक्षित स्थिरता आणली आहे. त्यामुळे ही योजना दारिद्र्य निर्मूलनामध्ये महत्त्वाचा आधारस्तंभ म्हणून काम करते. अंत्योदय अन्न योजनेतील सातारा जिल्ह्यातील लाभार्थ्यांची संख्या व अन्नधान्य नियतनाची संख्या घटलेली दिसून येत आहे. यावरून असे स्पष्ट होते की सातारा जिल्ह्यातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांच्या व लाभार्थ्यांच्या संख्येत घट होत आहे. अंत्योदय अन्न योजनेमुळे सातारा जिल्ह्यातील गरीब कुटुंबांची अन्नसुरक्षा वाढली आहे.उपासमार आणि कुपोषणासारख्या समस्या कमी करण्यासही मदत होत आहे. योजनेमुळे दारिद्र्याच्या तीव्रतेत काही प्रमाणात घट झाली आहे.या योजनेची प्रभावी अंमलबजावणी ,पारदर्शकता आणि स्थानिक सहभाग वाढल्यास दारिद्र्य वेगाने कमी होऊ शकते.

### ➢ अडचणी व मर्यादा

१) लाभार्थी निवडीत त्रुटी

२) धान्य वितरणातील विलंब

३) माहितीचा अभाव

१) ४)काही लाभार्थी कुटुंब माहिती अभावी योजनेपासून वंचीत.

४) अंत्योदय अन्न योजना लाभार्थी व प्राधान्य कुटुंब लाभार्थी निवडीत त्रुटी.

### ➢ सूचना-

१) लाभार्थी निवड अधिक पारदर्शक करावी.

२) धान्य वितरण नियमित व दर्जेदार असावे.

३) योजनेबरोबर रोजगारनिर्मिती योजना जोडाव्यात.

४) लाभार्थी यादी अद्ययावत करणे

५) डिजिटल प्रणाली अधिक प्रभावी करणे.

६) दारिद्र्य निर्मूलनाबाबत जनजागृती वाढवणे.

### ➢ संदर्भसूची –

१) R. Chinnadurai, Impact of Antyodaya Anna Yojana (AAY) on the Food Security of the Poorest of the Poor in Rural Areas, National Institute of Rural Development (India).

२) Kumari, S., Kumar, R., & Kumari, S. (2023), “Public Distribution System of Bihar: An Analytical Study…”, Journal of Business Management and Information Systems.

३) Dr. Shabi Raza (2013), “Effectiveness of Antyodaya Anna Yojna (AAY): in insuring food security…”, International Journal of Economic Perspectives.

४) Wikipedia – Antyodaya Anna Yojana (Scheme Overview)

५) Patil, B. (2019). Poverty Alleviation through Antyodaya Anna Yojana: A Critique. ResearchGate.

६) Government of India. (2000). Antyodaya Anna Yojana Scheme Details. Ministry of Food & Public Distribution.

७) सातारा जिल्हा आर्थिक सर्वेक्षण अहवाल २०२३- २४

८) Economics Survey of Maharashtra 2023-24

९) भारत सरकार – राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, 2013.

१०) महाराष्ट्र शासन – दारिद्र्य निर्मूलन योजना अहवाल, सामाजिक न्याय विभाग.